# जगभरचे विस्थापित

चन्द्रशेखर पुरन्दरे

***करोना संकटामुळे शहरे सोडून मूळच्या गावी जाऊ पहाणाऱ्या लाखो लोकांमुळे अंतर्गत विस्थापनाचा मुद्दा चर्चेस आला आहे. या संदर्भात जागतिक चित्राचे संक्षिप्त दर्शन या लेखात आहे.***

२०१८ साली जगातील १४८ देशांत लोक अंतर्गत विस्थापित झाले. अंतर्गत विस्थापित म्हणजे ते देशाच्या सीमा सोडून गेले नाहीत म्हणजे निर्वासित झाले नाहीत. या विस्थापनाची कारणे अनेक असतात. प्रमुख दोन कारणे-एक-मानवनिर्मित आपत्ती. हा प्रामुख्याने हिंसाचार असतो. युद्धे [दोन देशातील किंवा त्याच देशाच्या सरकारने जनतेविरुद्ध पुकारलेले युद्ध], वांशिक हिंसाचार [आफ्रिकेतील टोळीयुद्धे, म्यानमारमधील रोहिंग्या मुस्लिमांवर बौद्ध जनतेने व लष्कराने केलेले अत्याचार, इ.], गुन्हेगारी हिंसाचार [दक्षिण अमेरिका खंडातील देशांमधले अमली पदार्थांच्या व्यापारातील हिंसाचार], वगैरे. दोन-नैसर्गिक आपत्ती-भूकंप, वादळ, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर वगैरे. २०१८ मध्ये एकूण २.८ कोटी लोक विस्थापित झाले. त्यातील एक कोटीहून जरा जास्त हिंसाचारामुळे तर पावणे दोन कोटी नैसर्गिक आपत्तींमुळे. पण काही नैसर्गिक आपत्ती पर्यावरणाच्या अधोगतीशी निगडित असतात. त्यादृष्टीने त्या मानवनिर्मितही असतात. त्यामुळे हे विभाजन [संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या] काटेकोर मानता येणार नाही. पण एकूण अंदाज यावा.

एक संलग्न घटकही लक्षात घ्यायला हवा तो म्हणजे जगात काही समुदाय एकाच पिढीत एकाहून अधिक वेळा विस्थापित होतात.

विस्थापनाकडे दुसऱ्या प्रकारेही बघितले जाते. एक-'खेचणे', दोन-'ढकलणे'. वर सांगितलेले विस्थापन 'ढकलणे' या प्रकारचे असते. युद्ध, दुष्काळ वगैरे संकटे माणसाला विस्थापन करायला भाग पाडतात. पण अमेरिकेला नोकरीसाठी जाणारा भारतीय इंजिनीअर भारतात जगू शकत नाही असे नाही पण तो अमेरिकेच्या आकर्षणाने तेथे खेचला जातो.

विस्थापनाचे बहुपदरी रूप पुढील अभ्यासावरून कळावे.

काही ठिकाणी विस्थापनात लोक एका ठिकाणाची ग्रामीण वस्ती सोडून दुसऱ्या ग्रामीण वसतीकडे जातात किंवा दुसरी ग्रामीण वस्ती करतात. हे विस्थापन दक्षिण अमेरिका खंडात व आशियात आढळते. त्याची कारणे स्थानिक व भिन्न असली तरी ती प्रामुख्याने वाढती लोकसंख्या व अपुरी पडणारी पारंपरिक शेतजमीन ही असतात. द. अमेरिका खंडात ५० ते ७० च्या दशकात लोक जास्त करून ग्रामीण भागातून शहरांकडे गेले. मग ८०च्या जागतिक आर्थिक आणीबाणीमुळे ही दिशा बदलली. नंतरच्या काळात निम्मे विस्थापित एका शहरातून दुसऱ्या शहराकडे आले, एक-पंचमांश खेड्यातून शहरात आले तर उरलेले [जवळ जवळ एक-तृतीयांश] एका खेड्यातून दुसऱ्या खेड्यात गेले किंवा शहरातून खेड्याकडे गेले. ग्रामीण ते ग्रामीण हे विस्थापन बहुधा पारंपरिक शेतजमिनीकडून जंगलांच्या जवळच्या जमिनीकडे होते. तेथे नवी शेती केली जाते. एक-दोन पिढ्यानंतर हे विस्थापन पुन्हा नवीन जमिनीच्या शोधात होऊ शकते.

[विस्थापनाशी थेट संबंधित नाही पण एका अभ्यासानुसार आशियातील सरकारी 'राखीव' वनक्षेत्रापेक्षा राखीव नसलेल्या क्षेत्राची देखभाल स्थानिक लोक अधिक काळजीपूर्वक करतात.]

तुरळक ठिकाणी लोक शहरे सोडून ग्रामीण भागात स्थायिक होताना दिसतात. एकूण विस्थापनाच्या तुलनेत हे प्रमाण अगदीच लहान आहे. हे विस्थापनापेक्षा ऐच्छिक स्थलांतर म्हणता येईल. पोर्तुगाल देशातील अशा स्थलांतराचा अभ्यास झाला आहे. त्यानुसार शहरातून खेड्यात गेलेले लोक नवी कौशल्ये, नव्या कल्पना, नवे ज्ञान खेड्यात आणतात. नैसर्गिक संसाधनांचा

नवीन व पर्यावरण-स्नेही वापर त्यांच्यामुळे काही खेड्यात सुरू झाला आहे. नव्या प्रकारच्या शाळा, सामाजिक संघटना यामुळे ग्रामीण जीवन समृद्ध होताना दिसते.

विस्थापन तात्त्विक दृष्ट्या चार प्रकारचे असू शकते- ग्रामीण भागातून शहरांकडे, ग्रामीण भागातून दुसऱ्या ग्रामीण भागाकडे, शहरातून शहराकडे व शहरातून ग्रामीण भागाकडे. सामान्यत: आजवर पहिल्या प्रकारचे विस्थापन बहुतांशी आढळते. खेडे ते शहर. करोनाच्या उदयानंतर चौथ्या प्रकारचे विस्थापन आज भारतात दिसत आहे. ते दोनदा विस्थापनाचेही उदाहरण आहे - प्रथम हे लोक बिहार, उत्तर प्रदेश, छत्तीसगढहून शहरात आले, आता शहरात रहाणे अशक्य झाल्याने ते परत मूळ गावी परतू लागले आहेत. पण या चार प्रकारांखेरीज युद्धाने विस्थापित होणारे ना शहरात जाऊ शकत, ना खेड्यात. ते निर्वासितांच्या छावण्यात दीर्घ काळपर्यंत अडकतात.

विशेष म्हणजे, ऐतिहासिक दृष्ट्या यातील कोणत्याही विस्थापनाबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नसते. माहिती म्हणजे नक्की किती विस्थापित हा आकडा, ते नक्की का विस्थापित, कधीपासून विस्थापित, त्यांना 'स्थित' कधी म्हणता येईल, वगैरे. विशेषत: जेथे युद्ध व विस्थापन चालू असते तेथे बाहेरचा माणूस परिस्थितीची पहाणी करायला त्यावेळी जाऊच शकत नाही. आँखो देखा हाल जरी एखाद्या वृत्तवाहिनीने दिला तरी तो काही चौरस किलोमीटरपुरता मर्यादित असतो. उपग्रहांच्या फोटोंनुसार विस्थपितांचे अंदाज केले जातात. अशी अनिश्चितता धोरण आखण्यात अडथळा ठरते. मग ते धोरण सरकारचे असो किंवा स्वयंसेवी संघटनेचे असो-जी या लोकांची वेदना कमी करू इच्छिते. त्यात स्थानिक भ्रष्टाचार, प्रादेशिक राजकारण, राष्ट्रीय राजकारण खरे चित्र समोर आणत नाहीत. या प्रत्येकाचे हितसंबंध प्रत्येक पातळीवर कार्यरत असतात- एका विशिष्ट गटाचे विस्थापित जास्त आहेत, एकूण विस्थापितच कमी आहेत, विस्थापन झाले ते स्थानिक कारणांमुळे - समाजाच्या दोषी संरचनेमुळे नाही, सरकारी धोरणामुळे नाही. अशा अनेक असंलग्न दिशांना ते नेतात.

या मर्यादा लक्षात ठेऊनही पुढील खंडवार आकडेवारी- वरून जगातील विस्थापितांची परिस्थिती लक्षात यावी.

**मध्य व दक्षिण आफ्रिका खंड**

आफ्रिकेत जुन्या संघर्षात नवीन संघर्षांची भर पडली. त्यात दुष्काळ, वादळे आणि महापूर आले. एकूण ७४ लाख लोक संघर्षांमुळे तर २६ लाख लोक नैसर्गिक आपत्तींमुळे विस्थापित झाले. तेथील पाच देशांत परिस्थिती इतर देशांपेक्षा अधिक गंभीर आहे. तेथील देशवार विस्थापित असे - इथिओपिया - ३२ लाख, काँगो - १९ लाख, नायजेरिया - ११ लाख, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक - ५ लाख. केनिया, युगांडा, घाना वगैरे देशातही अशाच कारणांनी लोक विस्थापित झाले आहेत.

**मध्य-पूर्व आणि उत्तर आफ्रिका खंड**

जगातील तात्पुरत्या छावण्यांत रहाणाऱ्या एकूण विस्थापितांतील एक-चतुर्थांश म्हणजे एक कोटीहून जास्त लोक या प्रदेशात तशा छावण्यात रहातात. येथे पाण्याचे, अन्नाचे दुर्भिक्ष्य असते, स्वच्छता नसते, आरोग्यसेवा नसते, मुलांचे शिक्षण बंद पडते, इत्यादी निम्न-मानवी परिस्थिती. त्यात अतिवृष्टी, पूर यांच्यापुढे अशी तात्पुरती व्यवस्था टिकत नाही व परत विस्थापन होते. सीरियात हे घडले आहे.

या प्रदेशात २१ लाखाहून जास्त लोक *अलिकडच्या* संघर्षांमुळे नव्याने विस्थापित झाले तर दोन लाखाहून जास्त नैसर्गिक आपत्तींनी. तेथील देशांची आकडेवारी - सीरिया - पावणेसतरा लाख, येमेन - पावणेतीन लाख, इराक - सव्वा दोन लाख, इराण व लिबिया प्रत्येकी पाऊण लाख. या देशांमध्ये आणखी एक संलग्न घटक आहे - तो म्हणजे, संघर्षाची तीव्रता कमी झाली की लोक मूळ ठिकाणी परतू पहातात. त्यांची राहण्याची जुनी घरे उध्वस्त झालेली असतात. त्यामुळे तेही तात्पुरत्या छावण्यांत रहातात. उदा. इराकमध्ये असे २० लाख लोक परतले व छावण्यात अडकले आहेत. त्यातील ११ लाख तर २०१८ला परत आले.

**पूर्व आशिया आणि पॅसिफिक**

येथे संघर्षापेक्षा नैसर्गिक आपत्तींनी अधिक लोक विस्थापित झाले. नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना मिळाल्यास काही देशांच्या सरकारांनी लोकांना आधीच हलवले व तात्पुरते का होईना त्यांचे पुनर्वसन केले. त्यामुळे संघर्षग्रस्त विस्थापितांइतके त्यांचे हाल झाले नाहीत. येथे आपत्तींमुळे ९३ लाख, संघर्षांमुळे सव्वा-नऊ लाख विस्थापित झाले. त्यातील फिलिपिन्समध्ये ४० लाख, चीनमध्ये साडेसदतीस लाख, इंडोनेशियात साडेआठ लाख, म्यानमारमध्ये साडेतीन लाख आणि जपानमध्ये दीड लाख. नैसर्गिक आपत्तीत अतिवृष्टी, महापूर, त्सुनामी, वादळे,

इ. ऑस्ट्रेलियात वणवे पेटले. प्रमुख संघर्ष म्हणजे फिलिपिन्समध्ये सरकारी फौजा आणि मुस्लिम आतंकवादी यांच्यातील हिंसाचार तर म्यानमारमध्ये सरकारी फौजा व रोहिंग्या मुस्लिमांवरचे त्यांचे अत्याचार.

**दक्षिण आशिया**

येथेही संघर्षांपेक्षा नैसर्गिक आपत्तींमुळे बरेच जास्त विस्थापित झाले. आपत्तींमुळे ३३ लाख तर संघर्षांमुळे साडेपाच लाख. त्यात भारतात साडेअठ्ठावीस लाख, अफगाणिस्तानात आठ लाख, श्री लंकेत एक लाख, बांगलादेशात ७८ हजार तर नेपाळमध्ये १२ हजार. मुख्यत: अतिवृष्टी, वादळे आणि दुष्काळ या आपत्ती. भारतात वादळे आणि महापूर यांनी केरळ, आंध्र, तामिळनाडू, ओडिशा वगैरे १५ राज्यात हानी केली. यांचे थोडेफार पुनर्वसन झाले. काश्मीरमधील हिंसाचाराने दीड लाख विस्थापित झाले. अफगाणिस्तानात प्रचंड दुष्काळ पडला, तेथील गेली ४०-४५ वर्षे चालू असलेल्या हिंसाचाराने तितकेच विस्थापित झाले. आज तेथे पावणेचार लाख लोक हिंसेमुळे विस्थापित आहेत.

**अमेरिका**

इथे चित्र सरळ भौगोलिक आहे. दक्षिण अमेरिका खंडातील देशांत हिंसेने लोक विस्थापित होतात तर अमेरिका देशात नैसर्गिक आपत्तीने. अमेरिका खंडात जवळ-जवळ १७ लाख नैसर्गिक आपत्तींनी विस्थापित झाले तर ४ लाख ४ हजार हिंसाचाराने विस्थापित झाले. अमेरिका देशात आपत्तीने विस्थापित झालेल्यांचे पुनर्वसन वर म्हटल्याप्रमाणे बऱ्याच प्रमाणात सरकारने केले त्यामुळे ते बळी म्हणता येणार नाहीत. खंडातील विस्थापितांची देशवार आकडेवारी अशी - अमेरिका देश - साडेबारा लाख, अल -साल्वाडोर - अडीच लाख, कोलंबिया - सव्वादोन लाख, ब्राझील ८६ हजार, क्युबा - ५२ हजार. वादळे आणि वणवे हे अमेरिका देशातील संकट. कोलंबिया देशात सरकारी फौज आणि गेली ४५ वर्षे चालू असणारे नक्षलवाद्यांसारखी चळवळ यांच्यातील संघर्ष, व्हेनेझुएलामध्ये कोसळलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे ३० लाख लोक देश सोडून शेजारच्या देशात गेले, वगैरे.

**युरोप आणि मध्य आशिया**

जगात इथली परिस्थिती विस्थपित आणि त्यांची संख्या या दोन्ही दृष्टीने बरी आहे. विस्थापित काही हजारात आहेत. संघर्षाने १२ हजार तर आपत्तींनी ४१ हजार.

**करोना आणि विस्थापित**

हा प्रश्न दुहेरी आहे. एकतर वर म्हटल्याप्रमाणे छावण्यांत राहणारे कित्येक कोटी विस्थापित दाटीवाटीच्या घरात राहतात. तेथे पाणी, साबण, इतर सोयी उपलब्ध नसतात. तेथे सामाजिक अंतर काय पाळणार ? आधीच या प्रवासात त्यांची प्रतिकारशक्ती कमी झालेली असते. ते करोनाचे नवीन बळी, तेही प्रचंड प्रमाणावर होणे सहजशक्य आहे. त्याचा परिणाम त्यांना आणखीच बहिष्कृत करण्यात होईल.

दुसरा पैलू म्हणजे, आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुतेक देशांनी त्यांच्या सीमा बाहेरच्यांसाठी बंद केल्या आहेत. यामुळे काही हजार लोक तो विशिष्ट देश सोडू शकत नाहीत. त्यांना परत, तात्पुरत्या छावण्यात ठेवण्यात आले आहे. अधिक दूरगामी परिणाम म्हणजे, जे आंतरराष्ट्रीय मदतीवर अवलंबून आहेत, त्यांना ती मदत नाकारण्यात येत आहे. त्यामुळे देशांतर्गत विस्थापन वाढण्याचा संभव आहे. उदा. सीरियाने त्याच्या सीमा बंद केल्या आहेत. बाहेर जायचे म्हटले तरी ते आता शक्य नाही. दक्षिण सुदान देशातून युगांडा देशाला जाण्याचा प्रयत्न करणारे बरेच आहेत कारण त्यांना दक्षिण सुदानमध्ये त्यांच्या निवासस्थानी जीवाची भीती आहे. या लोकांना सीमा बंद केल्याने त्यांच्या गावी परत पाठवण्यात येत आहे.

स्थानिक पातळीवर अमेरिका व म्यानमारमधील बातम्यांनुसार हॉस्पिटल्सच्या कर्मचाऱ्यांना घराबाहेर काढण्यात येत आहे कारण ते संसर्ग आणतील. शिवाय करोनाच्या रुग्णांना वाळीत टाकण्याचे प्रकार पुण्यापासून जगभर सुरू झाले आहेत.

करोना आधीपासूनच्या विस्थापितांकडे आजवर जी सरकारी किंवा स्वयंसेवी संघटनांची मदत जात होती, तिला अचानक खीळ बसली आहे. एकूणच पैसा सगळेच देश करोना-मुळे होणाऱ्या हानीकडे वळवत आहेत. विस्थापित प्राधान्यक्रमावरून खाली गेले आहेत.

थोडक्यात एकूणच विस्थापनावर निश्चित जागतिक उपाय आजवर झालेला नाही किंबहुना निश्चित धोरणही दिसत नाही. विस्थापनच्या कारणांचे वैविध्य पहाता ते शक्यही नसावे.

www.purandarearts.com
www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk